# वित्तीय साक्षरता गाईड




भारतीय रिझर्व्ह बँक

ग्रामीण आयोजना व ऋण विभाग,
केंद्रीय कार्यालय, मुंबई

जानेवारी २०१३

# वित्तीय साक्षरता शिबिर - प्रशिक्षकांसाठी गाईड

(भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या आपल्या दिनांक 6 जून 2012 च्या परिपत्रक क्र. ग्राआऋवि. एफएलसी. सं. 12452/12.01.018/2011-12 अनुसार)

या दैनंदिनीमधील विषयांतर्गत मजकूर भारतीय रिझर्व्ह बँक, ग्रामीण आयोजन व ऋण विभाग, केंद्रीय कार्यालय, मुंबई द्वारा देशातील सर्व आर्थिक साक्षरता केंद्र आणि ग्रामीण शाखांद्वारे दर महिन्याला आयोजित केल्या जाणाऱ्या आर्थिक साक्षरता शिबिरांमध्ये वितरित करण्यासाठी तयार केला आहे. ही आर्थिक दैनंदिनी www.rbi.org.in या वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध आहे.

**लेखक**
सुषमा विज व गीता नायर

**रेखांकन**
आर.एन. रहाटे

**मराठी भाषांतर**
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई

**प्रथम आवृत्ती**
जानेवारी 2013

**प्रकाशक**

**ग्रामीण आयोजना व ऋण विभाग**
10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन
शहीद भगत सिंह मार्ग
फोर्ट, मुंबई - 400 001

**सर्वाधिकार**

मूळ प्रकाशकाच्या उल्लेखाच्या अटीवर पुर्नमुद्रणाकरीता प्रकाशकाची अनुमती आहे.

**आभार :**

एसियॉन इंडिया, इंडियन स्कूल ऑफ माइक्रो फायनान्स फॉर वुमेन (आइएसएमडब्ल्यू), परिणाम फाउंडेशन, संचयन सोसायटी आणि इतरांनी दिलेल्या माहितीसाठी त्यांचे विशेष आभार.

# प्रस्तावना

वित्तीय साक्षरता ही विविध आर्थिक सेवा व साधनांची मागणी निर्माण करते व सामान्य जनतेला बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या साधनांची, सेवेच्या आवश्यकतेची व लाभांची माहिती मिळते त्यामुळे आर्थिक समावेशकतेला गती मिळते. समाजाच्या सर्व गटांना कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आर्थिक साक्षरतेची गरज आहे. तथापि आपल्या समाजाचा एक मोठा घटक जो आर्थिकदृष्ट्या वंचित राहिला आहे व जो योग्य आर्थिक नियोजना अभावी सतत आर्थिक विवंचनेत असतो, अशा घटकांवर आपल्याला लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

मी जेव्हा आउटरीच कार्यक्रमासाठी दूरदूरच्या गावांमध्ये जातो, तेव्हा माझ्या असे लक्षात आले की आर्थिक साक्षरता कार्यक्रम अधिक परीणामकारक न होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे आर्थिक साक्षरतेसंबंधी एक मूलभूत अभ्यासक्रम आपल्याकडे उपलब्ध नाही. हे गाईड म्हणजे त्या विशिष्ट घटकांपर्यंत पोहचण्यासाठी सुसूत्रितपणे तयार केलेला आर्थिक साक्षरता अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम अधिक परिणामकारक असून उद्देशपूर्ती करु शकेल, असा मला विश्वास वाटतो. त्यामुळे सामान्य जनतेकडून बँकिंग सेवेची मोठी मागणी वाढेल. तसेच ग्रामीण शाखांचे शाखाप्रबंधक व जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक त्यांच्या मासिक वित्तीय साक्षरता शिबिरांसाठी या गाईडचा उपयोग करतील असे अपेक्षित आहे. हे गाईड योग्य ते बदल करुन शहरातील आर्थिक दुर्बल घटकांच्या प्रशिक्षणासाठी सुद्धा वापरता येईल. बँकानी वित्तीय साक्षरता कार्यक्रम आयोजन करण्याबरोबरच ग्राहकांना हवी ती सेवा माफक दरात उपलब्ध करुन दिली पाहिजे. आर्थिक समावेशनाच्या या कार्याला आपण एका कायमस्वरुपी, फायदेशीर संधीमध्ये रुपांतरित केले पाहिजे, त्यामुळे समाजातील मोठया घटकाला गरिबीतून आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल करता येईल व त्याचबरोबर बँकांना फायद्याची आणखी एक संधी उपलब्ध होईल.

(के.सी. चक्रवर्ती)
उप गव्हर्नर

# अनुक्रमणिका


| क्र.सं. | विषय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| 1. | प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शन | i - ii |
| 2. | आर्थिक साक्षरता शिबिरांचे संचालन - मार्गदर्शक सुचना | iii - v |
| 3. | तुमच्या पैशाची व्यवस्था करा | 1-6 |
| 4. | बचत | 7-9 |
| 5. | बँकेमध्ये पैसे ठेवणे | 10-16 |
| 6. | उसनवारी | 17-18 |
| 7. | बँकेतुन कर्ज घेणे | 19-22 |

# आर्थिक साक्षरता-प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शन :

1. आर्थिक साक्षरता शिबिर आयोजित करण्याचा उद्देश वित्तीय साक्षरता व वित्तीय सेवांची सहज उपलब्धता या दोन आवश्यक तरतूदींद्वारे आर्थिक समावेशकता आणणे हा आहे. या शिबिराचा उद्देश बचतीची सवय लावणे व आर्थिक उत्पादनांबद्दलची जाण वाढविणे की, ज्यामुळे ते आर्थिक सेवांचा अधिकाधिक उपयोग करुन घेऊ शकतील. आर्थिक साक्षरतेचा उपयोग त्यांना जीवनातील पुढील गरजांचे नियोजन करण्यासाठी व अनपेक्षित घटनांचा सामना कर्ज न घेता करण्यासाठी झाला पाहिजे. त्यांच्या पैशाचे त्यांना सकारात्मक व्यवस्थापन करता यावे व कर्जाचा विळखा टाळणे त्यांना शक्य व्हावे. माहीत करुन दिलेल्या ज्ञानाचा उपयोग बँकिंगच्या व्यवहारांची सेवांची सवय लागण्यासाठी कसा होईल हे पहाणे गरजेचे आहे. आर्थिक साक्षरता व आर्थिक सेवा यांच्या समन्वयामुळे सर्वसामान्य माणूस त्याच्या आर्थिक नियोजनतेवर योग्य ते नियंत्रण मिळवून तो स्वतःची आर्थिक सुरक्षितता बँकिंग सेवेद्वारे निश्चीत करु शकेल.

2. आर्थिक सेवा पुरवठादार म्हणून आर्थिक समावेशकता आणि आर्थिक साक्षरतेचा विकास बँकांना नवीन व्यवसाय संधीचा फायदा घेण्यास उपयुक्त ठरणारा आहे. लहान ग्राहकसुद्धा महत्त्वाचे असतात. छोट्या ग्राहकांमुळे उपलब्ध असलेल्या व्यवसाय संधीचा फायदा बँकांनी घेतला पाहिजे. बँकांनी आर्थिक साक्षरतेच्या प्रयत्नांकडे भविष्यातील गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. बँकांनी ओवरड्राफ्ट सुविधा, विविध आवर्ती ठेव योजना, किसान क्रेडिट कार्ड, रेमिटन्स इ. बँकिंग सेवा एकत्रितपणे खातेदारांना द्याव्यात जेणेकरुन खात्यांमध्ये व्यवहार होत राहतील. या खात्यांमध्ये व्यवहार करण्यास लोकांना प्रोत्साहित केल्यास बँकांचा खाते ठेवण्याचा खर्च वसुल होऊन बँकांसाठी हा निरंतर वाढणारा व फायदेशीर व्यवसाय होईल. पुरेसा कर्जपुरवठा करणे फक्त ग्राहकांसाठीच नव्हे तर बँकेसाठी सुध्दा महत्वाचे आहे. कारण कर्जपुरवठा करणे हे बँकेसाठी उत्पन्नाचे साधन आहे मात्र बँकांनी व्याजदर आकारताना स्पर्धात्मक व्याजदर ठेवावेत.

3. विविध आर्थिक सेवांची माहिती व त्याविषयी जागरुकता वाढविणे तसेच या सेवा ग्राहकांच्या दारात देणे हे त्यांची खाती मिळविण्याचे पहिले पाऊल आहे. वित्तीय साक्षरता गाईडचे उद्दिष्ट सोप्या शब्दांत पैशाचे व्यवस्थापन, बँकेत बचत ठेवल्यामुळे होणारे फायदे, बँकाद्वारे दिल्या जाणाऱ्या इतर सोयी सुविधा आणि बँकेतून कर्ज घेण्याचे फायदे याबाबत जनतेमध्ये जागरुकता निर्माण करणे व त्यांना शिक्षित करणे हे आहे. हे गाईड वित्तीय शिक्षण व वित्तीय समावेशकतामधील प्रशिक्षकांसाठी रेडी रेकनर आहे. आर्थिकदृष्टया मागास लोकांसाठी आयोजित मासिक वित्तीय व शिक्षण शिबिरामध्ये या गाईडचा उपयोग मानक पाठयक्रम म्हणून केला जावा.

या शिबिरातून वित्तिय साक्षरतेबरोबर बँकेत खाते उघडण्यासाठी विशेष शिबिरेसुद्धा घेण्यात यावीत तसेच या खात्यांचा वापर कसा केला गेला हेही पहाणे योग्य होईल. ज्या कारणामुळे खातेदारांना खाते वापरात अडचणी निर्माण होतात त्या कारणांचा बँकांनी आढावा घेऊन ती कारणे दूर करण्यासाठी योग्य ते प्रयत्न त्यांनी त्वरित करावेत. सदर शिबिराच्या आयोजनात स्थानिक प्रशासन, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि गैर सरकारी संस्थांचा समावेश करणे उपयुक्त होईल. या गाईडचा उपयोग मासिक वित्तीय शिबीरात आर्थिक समावेशनासाठी एक मानक गाईड म्हणून व्हावा.

❖❖❖

# आर्थिक साक्षरता शिबिरांचे संचालन-

**मार्गदर्शक सूचना**

सर्व आर्थिक साक्षरता केंद्रांनी व ग्रामीण बँकांनी आर्थिक साक्षरता शिबिरे आयोजित करण्याचे वार्षिक वेळापत्रक तयार करावे. प्रत्येक ठिकाणी तीन महिन्यांच्या अवधित तीन हप्त्यांमध्ये कार्यक्रम आयोजित केला जावा. ज्यात प्रत्येकी दोन तासांची तीन सत्रे असतील आणि लोकांना किमान स्मार्ट कार्ड वेळेवर दिली जातील याची खात्री करण्यासाठी एक प्रत्यक्ष भेट कार्यक्रम असेल. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी योग्य परिसर किंवा मोकळी जागा आधीच शोधून ठेवावी. नियोजित स्थळांच्या गरजा आणि उपलब्ध साधनांचा विचार करुन त्याप्रमाणे जास्तीत जास्त लोकांना बँकिंग सेवेच्या परिघामध्ये आणणे हेच उद्दिष्ट असले पाहिजे.

**प्रथम सत्र :**

- पहिल्या सत्रामध्ये प्रामुख्याने लोकांना आर्थिक संकल्पना, वैयक्तिक अर्थव्यवहार व पैशाचे व्यवस्थापन याबद्दल माहिती करून देण्यावर भर असावा. यासाठी बँकेने गावातील लोकांच्या छोट्या गटासाठी शिबिर आयोजित करावे व प्रस्तावित शिबिरांची पूर्व प्रसिद्धी करावी जेणेकरुन मोठ्या संख्येने लोक शिबिराला उपस्थित राहतील.
- शिबिराच्या पूर्व तयारीमध्ये गावातील प्रतिष्ठित व्यक्ती जसे सरपंच, शिक्षक किंवा गावातील लोकांशी चांगला संबंध असलेली कोणीही व्यक्ती यांचा सहभाग निश्चित करावा. कार्यक्रम आयोजित करण्यास ठरविलेल्या जागी योग्य व्यवस्था असावी. सहभागी लोक येण्यापूर्वी माहितीचे सर्व तक्ते योग्य त्या जागेवर लावलेले असावेत.
- या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांची नावे, वय, व्यवसाय इ. माहितीची यादी बनवावी.
- गाईडमध्ये दिलेले पुढील विषय कार्यक्रमात घ्यावेत आर्थिक नियोजन, (बजेट) अंदाज पत्रक बनवणे, बचत करणे, आर्थिक दैनंदिनी कशी लिहावी, बँकेत बचत करण्याचे फायदे, व्यवसाय प्रतिनिधी (B.C.), औपचारिक व अनौपचारिकरित्या कर्ज घेण्यातील फरक, कर्ज घेण्याचे कारण व व्याजदर, विविध प्रकारची कर्जे इ.
- कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येकास एकेक आर्थिक दैनंदिनी द्या. बजेट (अंदाज पत्रक) तयार करण्यासाठी व काळानुसार जमाखर्च लिहिण्यासाठी आर्थिक दैनंदिनीचा कसा उपयोगकरावा हे प्रत्येक सहभागीला सांगा. दैनंदिनी वापरण्याचे फायदे पुन्हाः

पुन्हा सांगावेत. बजेट तयार करण्यासाठी व मासिक जमा-खर्च लिहिण्यासाठी दैनंदिनीचा घरी उपयोग करायला सांगावा. जेव्हा ते पुढच्या सत्रातील कार्यक्रमास येतील, तेव्हा त्यांना त्यांची लिहिलेली दैनंदिनी बरोबर घेऊन येण्यास सांगावे.

- पहिल्या सत्राच्या शेवटी दुसऱ्या सत्राची तारीख जाहीर करावी आणि हेही सांगावे की दुसऱ्या सत्रात B.C. (व्यवसाय प्रतिनिधी)ची ओळख करुन दिली जाईल B.C.द्वारेसुद्धा खाते उघडता येते, ही माहिती गावकऱ्यांना द्यावी. खाते उघडण्यासाठी कोणती कागदपत्रे बँकेस द्यावी लागतील, त्याची माहिती द्या व पुढच्या सत्राला येताना ती सर्व कागदपत्रे सोबत आणायला सांगा. सर्व सहभागींनी दुसऱ्या सत्राला उपस्थित राहाणे कसे आवश्यक आहे हे स्पष्ट करा.
- माहितीचे सर्व तक्ते कायमस्वरुपी वाचण्यासाठी योग्य त्या जागी, जसे ग्रामपंचायतीत, सरपंच कार्यालयात, चावडीत किंवा शाळेत लावावेत.

**द्वितीय सत्र (पहिल्या सत्रानंतर 15 दिवसांनी)**

- कार्यक्रमातील सहभागीची उपस्थिती घ्या. मागच्या यादीनुसार जर कोणी गैरहजर असेल तर त्याच्या कारणांची आपुलकीने चौकशी करा. गावकऱ्यांना व्यवसाय प्रतिनिधीची ओळख करुन द्या आणि त्याचे बँकेशी असलेले संबंध, त्याच्याद्वारे व्यवहार करण्याचे फायदे, ठेव व कर्जे व इतर सेवा ज्या त्याच्याद्वारे मिळू शकतात इ. माहिती द्या.
- सहभागींना ICT डिव्हाईसच्या वापराचे प्रात्यक्षिक करुन दाखवा व प्रत्येक सुविधा कशी घेता येईल ते दाखवा उदा. पैसे खात्यात ठेवले किंवा खात्यातून काढले तर मशीन ते कसे दाखवते इ. दाखवा.
- सहभागींची त्यांनी लिहिलेली आर्थिक दैनंदिनी पहा. त्यांना दैनंदिनी लिहिण्यामध्ये काही अडचणी आल्या का ते पहा. काही दुरुस्ती करावयाची असेल तर करुन द्या आणि दररोज दाखवा. महिन्याला नियमितपणे दैनंदिनी लिहिण्यास सांगा.
- वेगवेगळ्या खात्यांची वैशिष्ट्ये सांगा जसे एका महिन्यात किती वेळा पैसे ठेवता/काढता येतील, पैसे ठेवण्या/काढण्यावर जर काही मर्यादा असतील तर त्या मर्यादा, लागू असलेल्या शुल्काची रक्कम, सामाजिक सुविधेअंतर्गत मिळणारे पैसे सरळ खात्यात जमा करुन घेण्याची पद्धत, खात्यामधून रेमिटन्स पाठवणे किंवा प्राप्त करुन घेण्याचे प्रकार इ.

- खाते उघडण्यासाठी सहभागींच्या/गावकऱ्यांच्या नावांची यादी बनवा.
- यादी बनवल्यानंतर खाते उघडण्यास साधारण किती वेळ लागेल ते त्यांना सांगा व हे ही सांगा की खात्यात व्यवहार करण्यासाठी त्यांना कार्ड मिळतील. कार्ड मिळाल्यानंतर लगेचच ते त्यांच्या रोजच्या वापरासाठी खात्याचा उपयोग कसा करु शकतात हे त्यांना सांगा.
- दुसऱ्या सत्रानंतर 15 दिवसांनी, गावकऱ्यांना कार्डे मिळाली आहेत किंवा नाहीत याची खात्री करण्यासाठी गावामध्ये प्रत्यक्ष भेट द्यावी. आणि ही खात्री करुन घ्या की BC ने व्यवहार चालू केले आहेत व गावकऱ्यांना व्यवहार करता येत आहेत.

**तृतीय सत्र (दुसऱ्या सत्रानंतर 2 महिन्यांनी)**

- मागच्या सत्रात खाते उघडण्यासाठी नावे दिलेल्या गावकऱ्यांची सभा घ्या. BC व गावकऱ्यांशी सरळ संवाद साधा.
- खात्यातील व्यवहार करताना किंवा ICT आधिरित प्रणालीचा उपयोग करण्यात खातेधारकांना काही अडचणी येतात का ते विचारा आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात त्यांच्या काही सूचना असल्यास त्यांना विचारा.
- खात्याचा उपयोग करण्यात त्यांना काही अडचणी येत नाहीत ना, हे पाहण्यासाठी खात्याच्या एकूण वापराचा आढावा घ्या.

**त्यानंतर नियमित रिपोर्टिंग सिस्टीमद्वारे व्यवहारांच्या पातळीचा लेखाजोखा घ्या**

# तुमच्या पैशाची व्यवस्था करा

## उत्पन्न म्हणजे काय ?

आपण विविध मार्गांनी जसे, पगार, मजूरी, शेती किंवा व्यवसायातून मिळविलेला पैसा म्हणजे आपले उत्पन्न होय.

| उत्पन्न (पैशाचा स्रोत) | रक्कम (रु) |
|---|---|
| पगार किंवा मजूरी | 2000 |
| शेती/व्यवसायातून आलेले उत्पन्न | 3000 |
| एकूण उत्पन्न | 5000 |

## खर्च म्हणजे काय ?

आपण वेगवेगळ्या कारणांसाठी खर्च केलेले पैसे म्हणजे आपला खर्च होय. यामध्ये आवश्यक गोष्टींवर खर्च केलेला पैसा व अनावश्यक गोष्टींवर खर्च केलेला पैसा दोन्ही येतो. आपण आपला खर्च समजावून घेऊया.

| खर्च (पैशाचा केलेला वापर) | रक्कम (रु) |
|---|---|
| अन्न, वस्त्र,निवारा | 2000 |
| शिक्षण | 1000 |
| कर्जाची परतफेड | 700 |
| आजारपण | 300 |
| दारू, गुटका | 500 |
| जुगार | 400 |
| लग्न,सणवार,तीर्थयात्रा इ. वर केलेला अतिरिक्त खर्च | 1100 |
| एकूण खर्च | 6000 |




## गुंतवणूक म्हणजे काय?

आपण आपल्या बचतीमधून काही पैसे अशा अपेक्षेने गुंतवतो की ज्यामुळे त्यामध्ये वाढ होते. त्याला गुंतवणूक असे म्हणतात. जसे जमीन खरेदी करणे, बँकेच्या मुदत ठेवीत पैसे ठेवणे इ.

## बचत म्हणजे काय ?




जेव्हा खर्चापेक्षा उत्पन्न जास्त असते व जेव्हा खर्च करुन आपल्याकडे पैसे उरतात, त्याला बचत असे म्हणतात.

## कर्ज म्हणजे काय ?




जेव्हा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त करावयाचा असतो व आपल्याकडे अशा खर्चासाठी काही बचत नसते व जेव्हा पैशाची कमतरता निर्माण होते आणि त्यासाठी आपणाला पैसे उसने घ्यावे लागतात तेव्हा त्याला कर्ज असे म्हणतात.

| उत्पन्न | खर्च | परिणाम | कृती |
|---|---|---|---|
| रु. 5000 | रु. 4000 | बचत रु. 1000 | पुढे व्हा |
| रु. 5000 | रु. 5000 | बचत नाही | विचार करा |
| रु. 3000 | रु. 6000 | कमी / तूट रु. 3000 | थांबा |







## कर्जाची व्यवस्था कशी करावी ?

एखाद्या महिन्यात उत्पन्नापेक्षा जास्त खर्च झाला, तर ती तूट भरुन काढण्यासाठी आधीच्या महिन्यातील बचत वापरावी. जर आपल्याकडे बचतच नसेल, तर जास्त व्याज देऊन पैसे उसने घ्यावे लागतील. हे आपण रोजच्या जीवनात पाण्याच्या वापराची व्यवस्था करतो, तसेच आहे. महापालिकेचे पाणी कधी पूर्ण दिवस येते तर कधी अजिबात येत नाही, तेव्हा आपण पाणी वापरायचे थांबवतो का ? नाही ! आपण पाण्याचा वापर थांबवित नाही. परंतु जेव्हा भरपूर पाणी येते तेव्हा

आपण ते भरुन ठवतो आणि जेव्हा कमी येते तेव्हा ते वापरतो. या कृतीला सुद्धा बचतच असे म्हणतात. आपली वित्त म्हणजे  एक मडके आहे त्याच्या तळाला बाहेर पडण्यासाठी  नळ आहे. मडक्यात  जाणारे पाणी म्हणजे आपले उत्पन्न आहे आणि मडक्यातून वाहून जाणारे पाणी म्हणजे आपले खर्च आहेत.

**अनावश्यक खर्चांना कात्री लावा आणि आपली बचत वाढवा.**

## आवश्यक आणि अनावश्यक खर्चामध्ये काय फरक आहेत?

आवश्यक  खर्च म्हणजे जीवनावश्यक गरजांवर केलेला खर्च जो आपण टाळू शकत नाही जसे, अन्न वस्त्र, निवारा, मुलांचे शिक्षण, आरोग्य इ. होय. अनावश्यक गोष्टींवर केलेला खर्च म्हणजे  आपल्या इच्छा/आवडीवर  वा ज्या गोष्टी हव्या असतात व ज्यामुळे आपल्याला आनंद मिळतो, मजा येते यावर केलेला खर्च होय. परंतु त्या आपल्या  जगण्यासाठी आवश्यक नसतात.

## आपण आपल्या पैशाची व्यवस्था कशी करावी?


आर्थिक योजना तयार करुन आपण आपल्या पैशाची व्यवस्था करु शकतो. आर्थिक योजनेचे पहिले पाऊल म्हणून आपण ठराविक काळासाठी जसे  एक आठवडयाचे किंवा एक महिन्याचे उत्पन्न व खर्च लिहिण्यासाठी  दैनंदिनी ठेवावी.

## आर्थिक नियोजन काय आहे?

आपल्या पूर्ण जीवनचक्रामध्ये आपल्याला लागणाऱ्या आर्थिक गरजा जसे मुलाचा जन्म, त्यांचे  शिक्षण, घर खरेदी, लग्न, बियाणे खरेदी इ. किंवा आणिबाणीची  परिस्थिती  जसे आजारपण, अपघात, मृत्यू, पूर, दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती इ. व त्या कशा भागवणार यांचा अंदाज  करणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.

## आर्थिक नियोजन का केले पाहिजे?

आर्थिक नियोजन केल्यामुळे आपणास आपल्या उत्पन्नाचा स्तर लक्षात घेता येतो व त्याप्रमाणे आपल्या भावी खर्चाची आगाऊ तजवीज करता येते. याचा आपल्याला दोन प्रकारे फायदा होतो, एक-भावी खर्च भागवण्याच्या दृष्टीने आपण आपल्या उत्पन्नातील एक भाग नियमितपणे वाचवू शकतो आणि दोन-भावी खर्चासाठी पैसे वाचवण्याच्या दृष्टीने आपण अनावश्यक गोष्टींवरील खर्च कमी करु शकतो. म्हणून आजच आपण आर्थिक नियोजन सुरु करुया जेणे करुन आपणास आपले कर्ज फेडण्याची क्षमता येईल, आणि इतकी बचत करुया की आपल्याला स्वतःच्या पैशांनी घर विकत घेता येईल किंवा उच्च शिक्षण घेता येईल.




**आर्थिक नियोजनाद्वारे तुमचे उद्दिष्ट साध्य करा.**

## आर्थिक नियोजन कसे करावे ?

- आपण आपल्या वर्तमान आर्थिक स्थितीचा अंदाज घ्या (आज आपण कुठे आहोत?)
- आपल्या आर्थिक गरजा निश्चित करा - आपल्याला कमी वेळात (1 वर्ष), मध्यम काळात (1 ते 5 वर्ष) आणि दीर्घ काळात (5 वर्षांपेक्षा जास्त) काय मिळवायचे आहे? ते ठरवा.
- प्रत्येक वस्तूच्या किंमती व ती वस्तू केव्हा मिळवायची आहे याचा अंदाज घ्या. प्रत्येक आठवडयात/महिन्यात किती बचत करणे आवश्यक आहे याचा हिशेब करा.
- आर्थिक दैनंदिनी तयार करा-आठवडयाचे/महिन्याचे उत्पन्न व खर्च त्यात लिहून काढा.

- खर्चावर नियंत्रण ठेवा, विचार करुन खर्च करा.
- आपण आपल्या बचतीचा नियमितपणे आढावा घ्या, आणि बचत योजनेप्रमाणे होत आहे का ते तपासा. नसेल तर खर्चाकडे पुन्हा लक्ष द्या काही खर्च कमी करण्याची शक्यता आहे का, की ज्यामुळे बचत वाढू शकेल, याचा अंदाज घ्या.
- प्रत्येक आठवडयाला/महिन्याच्या शेवटी वाचविलेल्या रकमेचा हिशेब पाहा आणि वाचवलेले पैसे आपल्या बँक खात्यात जमा करा.

## आर्थिक दैनंदिनी का ठेवावी ?





आर्थिक दैनंदिनी आर्थिक नियोजन तयार करण्यास मदत करते. आर्थिक दैनंदिनी लिहिण्यामुळे महिन्यात आपण आवश्यक व अनावश्यक गोष्टींवर किती खर्च करीत आहोत हे लक्षात येते. त्यामुळे आपल्याला कोणते खर्च टाळले पाहिजेत किंवा कमी केले पाहिजेत हे ओळखण्यास मदत होते. एकदा का आपल्याला ते कळले की, आपण त्यावर नियंत्रण ठेऊ शकतो. हे पैसे आपण वाचवू शकतो व गरीबीचे चक्र तोडू शकतो.

## खर्च करण्यापूर्वी दोनदा विचार करा.

उदा. आपले मासिक उत्पन्न आहे रु. 5000, आर्थिक दैनंदिनी लिहिल्यामुळे आपल्याला केलेले खर्च लक्षात येतात जसे की अन्न, वस्त्र, निवारा (रु.2000), मुलांचे शिक्षण (रु1000), घरभाडे (रु700), आजारपण (रु300) व सणवार, तीर्थयात्रा इ. आवडीच्या गोष्टींवर खर्च (रु500) आणि दारू, जुगार इ. वर खर्च (रु-500) आपण सणवार, तीर्थयात्रा यावरील खर्च रु500 वरुन रु200 पर्यंत कमी करु शकतो आणि दारू, जुगार यावरील रु500 चा खर्च पूर्णपणे टाळू शकतो. म्हणजेच रु800 वाचवू शकतो. आर्थिक दैनंदिनी ठेवल्यामुळे आपण पैसे वाचवू शकलो. अन्यथा आपण आपले पैसे व्यर्थ उडविले असते.

## आपण खर्च कसा कमी करु शकतो ?





उच्च शिक्षण


व्यवसाय

विचारपूर्वक खर्च करुन काही जादा वस्तूंवरील खर्च आपण कमी करु शकतो. हे वाचवलेले पैसे अधिक कमाई न करताही आवश्यक गोष्टींवर खर्च करण्यासाठी अतिरिक्त उत्पन्न होऊ शकते. हे समजायला खूप सोपे आहे. उदा. जर आपण दिवसाला 4 कप चहा पीत असू तर 30 दिवसांना (एका महिन्याला) आपण 120 कप चहा घेतला. जर एका कपाला रु5 खर्च करावे लागत असतील तर महिन्याचा चहावरचा एकूण खर्च रु600 झाला. जरा थांबा आणि विचार करा की खरोखर आपल्याला दिवसाला 4 कप चहा पिणे गरजेचे आहे का? जर आपण रोज दोनच कप चहा घेतला असता तर खर्च रु300 झाले असते व बाकीची रक्कम रु300 आपण वाचवू शकलो असतो.

जरी आपल्याला 4 कप चहा पाहिजे असला तरी आपली गरज मुळात 2 कप चहानेही भागली असती. म्हणजेच एका दृष्टीने आपले उत्पन्न महिन्याला रु300 नी वाढले असते व वर्षाला आपले रु3600 वाढले असते.

**पैसे वाचवणे म्हणजेच पैसे कमावणे.**

❖❖❖❖

# बचत

## आपण बचत का करावी?

आपण जर नियमितपणे बचत केली तर त्या बचतीचा उपयोग जेव्हा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होणार असतात आणि जेव्हा आपल्याला जास्त पैशांची गरज भासते तेव्हा करु शकतो.




- खूप मोठे खर्च भागवण्यासाठी जसे बाळंतपण, शिक्षण, लग्न, शेतीसाठी बियाणे खरेदी करणे स्वतःचे घर घेणे इ. वरील खर्च.
- अचानक उद्भवणारे खर्च भागवण्यासाठी जसे आजारपण, अपघात, मृत्यू, नैसर्गिक आपत्ती आणिबाणीच्या परिस्थितीत बचतच आपल्या कामाला येते.
- जेव्हा आपण पैसे कमवू शकत नाही अशा वेळी पैशाची गरज असते.
- आपल्याला म्हातारपणात पैशाची गरज असते.
- आपल्या नियमित उत्पन्नामधून आपण जी वस्तू घेऊ शकत नाही अशी वस्तू विकत घेण्यासाठी पैशांची गरज असते.

थोडक्यात, जेव्हा आपण कमावतो त्यापेक्षा जेव्हा जास्त खर्च करायचा असतो, तेव्हा जर आपल्याकडे पुरेशी बचत असेल, तर त्या बचतीतून हा खर्च भागवू शकतो.

## बचत कशी करावी?

आपण खर्च कमी करुन किंवा उत्पन्न वाढवून बचत करु शकतो. समजा उत्पन्न तेवढेच आहे तर आपण एकतर आवश्यक किंवा अनावश्यक वस्तू खरेदी करण्यात पैसे वापरतो. आवश्यक वस्तू म्हणजे ज्यावाचून आपले खरेच अडते, जसे अन्न, वस्त्र, घराची दुरुस्ती, शेतीची अवजारे व बियाणे, मुलांचे शिक्षण आणि आरोग्य या सर्व गोष्टी आपल्या दैनंदिन जीवनासाठी

आवश्यक आहेत. अनावश्यक वस्तू या आपल्या जीवनात अतिरिक्त असतात म्हणजे त्या फक्त आपल्याला मजा करण्यासाठी हव्या असतात. अशा वस्तूंवरील खर्च एकतर पूर्ण टाळता येऊ शकतात किंवा कमी करता येऊ शकतात किंवा पुढे ढकलता येऊ शकतात. जसे दारू ड्रग्ज,गुटखा, जुगार हे खर्च आपण टाळू शकतो, त्याचप्रमाणे लग्न, सणवार, तीर्थयात्रा यावरील केला जाणारा खर्च कमी करता येतो. तसेच आपण टीव्ही, स्कुटर, मोटर गाडी, दागीने इ. खर्च शक्यतो पुढे ढकलू शकतो. जितके आपण अनावश्यक वस्तूंवरील खर्च कमी करु, तेवढी रक्कम आवश्यक गोष्टींसाठी जास्त बचत करु शकू.

### नेहमीच्या गरजा भागवण्यासाठी जर पुरेसे पैसे नसतील, तर त्यातून आपण बचत कशी करु शकतो?

हा एक नेहमीचा प्रवाद आहे की आम्ही पुरेसे कमावत नाही तर बचत कशी करणार? खरे असे आहे की प्रत्येकाला बचतीची गरज आहे आणि प्रत्येकजण बचत करु शकतो. आपल्या कमाईची सुरुवात झाल्याच्या पहिल्या दिवसापासून आपण कमाईतील एक हिस्सा बाजूला काढून ठेऊ शकतो. महत्त्वाचे हे आहे की आपण आपल्या आयुष्यात लवकरात लवकर व नियमितपणे बचत केली पाहिजे जरी अगदी लहान रक्कम असली तरीसुद्धा चालेल. तसेच जर आपल्याला अचानक काही कमाई /फायदा झाला तर तो पूर्णपणे किंवा त्याच्या मोठ्या भागाची बचत केली पाहिजे. यामुळे भविष्यातील आर्थिक गरजांची विवंचना दूर होईल आणि अचानक उद्भवलेल्या खर्चांना तोंड देणे सोपे जाईल.

जर आपले रोजचे उत्पन्न रु100 असेल तर आपण रु20 वाचवू शकतो आणि उत्पन्न रु10 असेल तर रु2 वाचवू शकतो. जर रु100 मधील रु20 आपण बाजूला ठेवले तर कमाईच्या 5 दिवसांमध्ये आपण एका दिवसाच्या कमाईची बचत करु शकतो. 100 कमाईच्या दिवसांमध्ये 20 दिवसांच्या उत्पन्नाइतकी बचत आणि वर व्याज, आहे की नाही नेत्रदीपक !

| | |
|---|---|
| प्रत्येक दिवसाचे उत्पन्नप्र | रु100 |
| प्रत्येक दिवसाचा खर्च | रु80 |
| प्रत्येक दिवसाची बचत | रु20 |
| एका महिन्याची बचत | 20x30 = रु600 |
| एका वर्षाची बचत | 600x12 = रु7200 |
| वर्षाला 8% ने व्याज | रु318 |
| वर्षाच्या शेवटी बचत | रु7518 |
| ही रक्कम 75 दिवसांच्या उत्पन्ना इतकी आहे. | |

## किती काळापर्यंत बचत करावी?

जितका जास्त काळ बचत करु, तितकी आपली बचत वाढेल. जितकी बचत जास्त तितके आपण आणिबाणीच्या काळासाठी, कमाई करु शकत नसलेल्या अशा म्हातारपणातील काळात आर्थिक दृष्ट्या सक्षम राहू. आपल्या गरजा भागविण्यासाठी आपणास इतर कुणावरही अवलंबून रहाण्याची गरज लागणार नाही. जशी आपली बचत वाढेल तसेच आपल्या गरजांसाठी कोणाकडूनही पैसे मागावे लागणार नाहीत.

| वय | 25 वर्षे | 35 वर्षे | 45 वर्षे |
|---|---|---|---|
| प्रत्येक वर्षी जमा केलेली रक्कम | 1000 | 1000 | 1000 |
| किती वर्षे जमा केली | 40 | 30 | 20 |
| बचतीची रक्कम | 40000 | 30000 | 20000 |
| वार्षिक 10% दराने व्याज | 422878 | 142033 | 39900 |
| वयाच्या 65 व्या वर्षी एकूण रक्कम | 462878 | 172033 | 59900 |

जेव्हा आपण जास्त काळासाठी बचत करतो, तेव्हा झालेल्या बचतीवर अधिकतम व्याज मिळून आपली बचत दुपटीने /तिपटीने वाढत जाते.

❖❖❖

# बँकेमध्ये पैसे ठेवणे

## बचत कुठे ठेवावी ?




आपण कदाचित जर वाचवलेले पैसे उशीखाली किंवा डब्यात ठेवत असाल तर आपण कायम त्या पैशाच्या सुरक्षेबद्दल काळजी करीत रहाल. काहीवेळा उंदीर किंवा कीटक आपले कष्टाचे पैसे खाऊन टाकतील. कधी ते चोरीला जातील तर काहीवेळा आपल्याला खर्चून टाकण्याची इच्छा होते किंवा दुसऱ्या व्यक्ती आपल्याकडे ते उसनवारीने मागतात. विशेष म्हणजे घरात ठेवलेले पैसे वाढत नाहीत. बचतीचा उत्तम मार्ग म्हणजे हे पैसे बँक खात्यात ठेवावेत. कमीत कमी पैसे हातखर्चासाठी डब्यात ठेवावेत मात्र आपण वाचवलेले पैसे बँकेत ठेवणेच योग्य आहे, कारण त्यावर व्याज मिळून ते वाढतात.

**तुमचे कष्टाचे पैसे वाया घालवू नका. नेहमी पैसे बँक खात्यातच ठेवा.**

## बचत बँकेतच का करावी ?

बँका रिझर्व बँक व सरकारी नियंत्रणाखाली असल्यामुळे त्या सुरक्षित आहेत आणि तेथील बचत राष्ट्र उभारणीसाठी वापरली जाते. सुरक्षेततेशिवाय, बँका पैसे त्यांच्याकडे ठेवण्यासाठी फी लावत नाहीत मात्र उलट तेच आपल्या ठेवींवर व्याज देतात, त्यामुळे आपले पैसे वाढतात. आपले पैसे बँकेत ठेवले म्हणजे आपल्याला गरज पडेल तेव्हा काढून वापरता येतात. बँकेचे व्यवहार पारदर्शक असतात. बँका इतरही खूप सेवा देत असतात. जेव्हा आपण बँकेत खाते उघडतो, तेव्हा बँका आपल्याला कर्ज, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी परगावी पैसे पाठवण्याची सुविधा (रेमिटन्स), तसेच इतरही सुविधा खूप कमी फी आकारून सहज देतात. आपल्या मृत्यूनंतर आपल्या पैशांवर ज्याचा हक्क असावा असे आपणास वाटते, त्या व्यक्तीचे नाव आपण आपला वारसदार म्हणून नोंदवू शकतो.

## नामनिर्देशित करणे म्हणजे काय ?

नामनिर्देशित करणे ही एक सुविधा आहे, खातेदार अशा व्यक्तीला अधिकार देतो की, त्या व्यक्तीला खातेदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या खात्यात असलेल्या रकमेवर वारसदार म्हणून

आपला हक्क सांगता येतो म्हणून खातेदाराने प्रत्येक खात्यावर नामनिर्देशन करणे अगदी आवश्यक आहे. ज्यामुळे नामनिर्देशित व्यक्तीला म्हणजेच वारसदाराला ती रक्कम सहजपणे मिळेल.

**बँकेत खाते असण्याचे काय फायदे आहेत?**




- बँक खाते आपल्याला एक ओळख देते. जी इतर सरकारी कार्यालयांमध्ये ग्राह्य धरली जाते.
- बँक खात्यांमध्ये व्यवहार पारदर्शक असतात. जसे आपण जमा केलेल्या ठेवी, पैसे काढण्याच्या नोंदी, व्याज इ. माहिती मिळते.
- बँका भेदभावरहित असतात, म्हणजे बँकेचेच नियम एका प्रकारच्या सर्व ग्राहकांसाठी सारखेच असतात.
- बँकेत आपले पैसे सुरक्षित असतात.
- आपल्या गरजेनुसार आपणास बँकेत बचत खाते, आवर्ती खाते किंवा मुदत ठेव खाते उघडता येते व बँक त्यावर व्याज देते.
- आपली मजुरी/पगार आपण सरळ बँक खात्यात जमा करु शकतो.
- आपल्याला मिळणाऱ्या सामाजिक सुविधा जसे एमजीनरेगा मजुरी, निवृत्तीवेतन इ. इबीटी द्वारे सरळ बँक खात्यात जमा होऊ शकते.
- आपल्या गरजेनुसार आपण बँक खात्यात पैसे ठेवू शकतो किंवा काढू शकतो.
- गरज असेल तर आपण बँकेतून कर्जसुद्धा घेऊ शकतो, उत्पादक गोष्टींसाठी बँक वाजवी व्याजदराने कर्ज देते. जर आपले बँकेत खाते असेल, तर कर्ज घेणे सोपे होते.
- बँकेद्वारे आपण पैसे दुसऱ्याला पाठवूही शकतो.

**बँकेत बचत खाते असेल म्हणजे त्याबरोबर इतर सेवाही मिळणारच.**

## इबीटी काय आहे?

इबीटी म्हणजे इलेक्ट्रॉनिक बेनिफिट ट्रान्सफरद्वारे सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या रकमा जशा एमजीनरेगाची मजुरी, म्हातारपणाचे निवृत्तीवेतन, विधवा निवृतीवेतन, एलपीजी सहायता निधीअंतर्गत नगदी अंतरण इ. देय असलेल्या रकमा कोणत्याही मध्यस्था शिवाय सरळ आपल्या खात्यात इबीटीद्वारे जमा होतात. यामुळे प्रचलित मानवी कार्यपद्धतीमुळे होणारा उशीर आणि पैशाची होणारी गळती टाळता येते. आपल्याला जेव्हा हवे तेव्हाच आपण पैसे काढू शकतो, किंवा बँकेच्या इतर सेवा सुविधा सुद्धा घेऊ शकतो.

## रेमिटन्स म्हणजे काय आहे?

जेव्हा आपण दुसऱ्या व्यक्तीला ती देशात कितीही दूरच्या ठिकाणी राहात असली तरी तेथे बँकेद्वारे तिला पैसे पाठवू शकतो. बँक आपले पैसे एका ठिकाणाहून दुसरीकडे, एका व्यक्तीकडून दुसरीकडे सुरक्षितपणे व जलद पाठवित असते. जर आपले बँकेत खाते असेल तर, आपण आपल्या मुलाला जरी तो दुसऱ्या शहरात शिकायला गेला असेल तरी त्याला सहजपणे पैसे पाठवू शकतो. तसेच आपले नातेवाइक जे दूरच्या ठिकाणी काम करीत असले तरी तेथून त्यांना आपल्या खात्यात सहजपणे पैसे जमा करता येऊ शकतात.

## व्याज काय आहे?

जेव्हा आपण पैशाची बचत करतो व ती बँकेत आपल्या खात्यात ठेवतो त्या रकमेवर बँकेकडून देण्यात येणारे पैसे म्हणजे व्याज किंवा आपण जेव्हा पैसे उसने घेतो तेव्हा आपल्याला उसने घेतलेल्या रकमेपेक्षा अधिकची जी रक्कम द्यावी लागते तिला व्याज म्हणतात. बँकेत ठेवलेले पैसे तसेच पडून राहात नाहीत तर ते पैसे बँक इतरांना कर्जाऊ देते. जे लोक बँकेकडून कर्ज घेतात ते बँकेला त्या मोबदल्यात काही अधिकची रक्कम देतात त्याला व्याज असे म्हणतात.

समजा आपण बँकेत रु1000 जमा केले तर बँक ते पैसे दुसऱ्या व्यक्तीला कर्जाऊ देते. एक वर्षानंतर ती व्यक्ती बँकेला समजा रु100 शुल्क म्हणून देते. त्याचा काही भाग समजा रु 40 बँक आपल्याला देते. हे जे अधिकचे उत्पन्न आपण रु 1000/- वर एक वर्षाच्या कालावधीसाठी बँकेत ठेवल्यामुळे मिळाले, ते म्हणजे व्याज होय.

**सावकार त्याने दिलेल्या कर्जावर 3% प्रमाणे व्याज लावतो असे सांगितले जाते, तर मग बँकेच्या तुलनेत आपण सावकाराला जास्त व्याज देतो असे कसे म्हणता ?**

बँकेने सांगितलेला व्याजदर हा वार्षिक असतो, तर सावकार सांगतो तो व्याजदर मासिक असतो. त्यामुळे जेव्हा सावकार 3% व्याजदर सांगतो तेव्हा तो वर्षाला 36% होतो (3x12) परंतु बँक जेव्हा 12% व्याजदर सांगते तेव्हा तो वर्षाचा व्याजदर असतो. अशाप्रकारे बँकेने लावलेला व्याजदर हा सावकारापेक्षा खूपच कमी असतो जो सावकाराला द्यावा लागणाऱ्या जास्त व्याजदरापासून आपली सुटका करतो.

**ठेव खात्याचे कोणते विविध प्रकार आहेत?**

बँकेत खालील 3 प्रकारची ठेव खाती असतात- बचत खाते, मुदत खाते आणि आवर्ती खाते.

- बचत खाते - आपण आपली रोजची शिल्लक रक्कम ठेवण्यासाठी बचत खात्याचा वापर करु शकतो. या खात्यातून आपल्याला गरजेनुसार पैसे काढता येतात. बचत खात्यावर आपल्याला आणिबाणीच्या प्रसंगी कर्ज (ओव्हर ड्रॉफ्ट) सुद्धा मिळू शकतो.
- मुदत ठेव खाते - आपल्या गरजेनुसार ठराविक काळासाठी मुदत ठेव खात्यात पैसे ठेवता येतात. आपण आधीच एका ठराविक मुदतीसाठी या खात्यात पैसे ठेवल्यामुळे, त्यावर आपल्याला थोडे जास्त प्रमाणात व्याज मिळते. मुदत पूर्ण होण्याच्या तारखेपूर्वीसुद्धा आपण या खात्यातून पैसे काढू शकतो, मात्र अशावेळी आपल्याला थोडे कमी व्याज मिळते.
- आवर्ती ठेव खाते - या खात्यात ठराविक रक्कम ठराविक काळासाठी ठराविक कालांतराने म्हणजे, दररोज, दर आठवड्याला, दर महिन्याला ठेवता येते. नियमित बचत गुंतवण्यासाठी याचा वापर करता येतो.

**बँकेत बचत खाते कसे उघडावे ?**

खाते उघडण्याचा फॉर्म भरुन आपण बँकेत खाते उघडू शकतो, फॉर्मसोबत आपला अलीकडच्या काळात काढलेला एक फोटो व ''आपल्या ग्राहकाला जाणा'' (KYC) साठी आवश्यक असलेले कागदपत्र म्हणजे आपली ओळख व राहाण्याचा पत्ता यांचा पुरावा देणे आवश्यक आहे.

### आपल्या हातात जर पैसे नसतील तर आपण बँकेत खाते कसे बरे उघडू शकतो?

आता बँकेत खाते उघडण्यासाठी पैशाची आवश्यकता नाही. रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना असे निर्देश दिलेले आहेत की त्यांनी शून्य बाकी असणारी सुद्धा खाती उघडावीत. त्याला मूळ बचत बँक ठेव खाते असे म्हणतात, असे खाते कोणीही व्यक्ती उघडू शकते, त्यासाठी किमान शिल्लक ठेवण्याची आवश्यकता नाही.

### मूळ बचत बँक  ठेव खाते म्हणजे काय?

मूळ बचत बँक ठेव खाते म्हणजे ''शून्य शिल्लक असलेले बँक खाते'' होय. या खात्यात कितीही  वेळा पैसे ठेवले तरी त्यावर बँक शुल्क लावत नाही. त्याशिवाय  या खात्यात  एक महिन्यात 4 वेळा पैसे काढता येतात व त्यावर बँक शुल्क लावत नाही. याशिवाय आपल्याला पासबुक आणि ATM/स्मार्ट कार्ड कोणतेही शुल्क भरल्याशिवाय मिळते. हे खाते आपण आपल्या दररोजच्या  गरजा जसे पैसे भरणे, काढणे, पैसे पाठवणे, सामाजिक सुविधांचे पैसे सरळ खात्यात  जमा होणे इ.साठी  वापरु शकतो.

### (KYC) तुमच्या ग्राहकाला जाणा म्हणजे काय?

KYC नियमांनुसार खाते उघडण्यापूर्वी खातेदाराची माहिती जाणून घेणे बँकेला बंधनकारक आहे. आधार कार्डाच्या आधारावर सुद्धा आपण खाते उघडू शकता. ज्यांच्याकडे KYC अनुसार  कागदपत्रे नसतील, अशा व्यक्ती त्यांचे खाते एमजीनरेगा जॉब कार्ड किंवा स्वतः प्रमाणित करुन शिथिल KYC पद्धतीने उघडू शकतात. अशा शिथील पद्धतीने उघडलेले खाते ''लहान खाते'' समजले जाईल व त्यावर काही मर्यादा असतील.

### ज्या गावात एकाही बँकेची शाखा नसेल तेथे  बँक खाते कसे उघडणार?

आता आपल्याला बँकेच्या सुविधा घेण्यासाठी  आपल्या विभागात बँकेची शाखा असण्याची गरज  नाही. अशा गावामध्ये बँक आपला व्यवसाय प्रतिनिधी (BC) नेमतात, जो बँकेचा एजंट म्हणून काम करतो. तो त्या गावचा मूळ रहिवासी असतो व त्याला त्यांच्या भागातील आर्थिक  विकासात रस असतो. हे व्यवसाय  प्रतिनिधी आपल्या गावात / जवळपासच्या गावांमध्ये बँकिंग सेवा पुरवतात. व्यवसाय प्रतिनिधींची नेमणूक करताना बँक त्यांची

गावकऱ्यांना ओळख करुन देतात. आपल्याला त्यांची माहिती ग्रामपंचायतींतूनही मिळू शकते.

## BC (व्यवसाय प्रतिनिधी) कोण आहे? तो कसा काम करतो ?

स्थानिक व्यक्ती वा इतरांना बँकेचे एजंट म्हणून काम करण्यासाठी बँक त्याची B.C. म्हणून नेमणूक करते. BC माहिती व संपर्क तंत्रावर (ICT) आधारित यंत्रे जसे हातातील मशिन, स्मार्टकार्ड आधारित डिव्हाइस, मोबाईल फोन इ.चा उपयोग करुन बँकिंग व्यवहार म्हणजे ठेवी जमा खात्यात स्वीकारणे, पैसे काढून देणे, ही कामे करतो.

**बँक आता तुमच्या दारात आली आहे.**

## BC कडे आपण आपले पैसे ठेवले तर ते सुरक्षित आहेत का ?

होय, BC म्हणजे बँकिंग सेवा आपल्या दाराशी आणणारा दूत आहे कारण बँकेच्या शाखा आपल्या घरापासून फार दूर आहेत. BC कडे पैसे ठेवणे म्हणजे बँकेच्या शाखेत पैसे ठेवण्यासारखेच आहे. ICT आधारीत डिव्हाइसवरुन व्यवहार केले जातात व बँकेच्या पुस्तकांमध्ये त्याचा हिशेब ठेवला जातो. ग्राहकांना त्यांचे व्यवहार ताबडतोब तपासता येतात कारण BC च्या द्वारे पैसे काढले किंवा ठेवले तर बँकेच्या वतीने लगेच त्याची पावती दिली जाते. शिवाय BC द्वारे केले जाणारे व्यवहार आपल्या बायोमेट्रिक्स किंवा पिन क्रमांकाद्वारे केले जातात. त्यामुळे इतर कोणीही आपल्या खात्यामध्ये व्यवहार करु शकत नाही.





## BC कोणकोणत्या सेवा पुरवितात?

BC ओव्हरड्राफ्ट, मुदतठेव व आवर्ती जमा ठेव योजना असलेली बचत खाती इत्यादी खाती उघडतात व ते आपल्या खात्यातून पैसे पाठविणे आणि आपल्या खात्यात रक्कम जमा करुन देणे हेही काम करतात. याशिवाय उत्पादक कामासाठी शेतीविषयक कामासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि बिनशेती कामासाठी जनरल क्रेडिट कार्ड द्वारे कर्ज मिळवून देतात.

## ओव्हरड्राफ्ट म्हणजे काय? ते इतर कर्जापेक्षा वेगळे कसे?

आपल्या अचानक उद्‌भवणाऱ्या छोटया गरजा भागविण्यासाठी बचत खात्यावर कागदपत्र सादर न करता घेता येणारे छोटे कर्ज म्हणजे ओव्हर ड्राफ्ट होय. आणिबाणीच्या वेळी बँक आपल्याला वेळेवर कर्ज उपलब्ध करुन देत असल्यामुळे या ओव्हरड्राफ्टच्या रकमेवर आपल्याला व्याज द्यावे लागते. याशिवाय बँक, इतर कर्ज जसे किसान क्रेडिट कार्ड व जनरल क्रेडिट कार्ड उत्पन्न निर्मिती करण्याच्या विशिष्ट उद्देशाने देत असते.

जेव्हा आपणास पगार किंवा मजुरीद्वारे पैसे मिळतात त्याला आपण आपले उत्पन्न म्हणतो. मात्र जेव्हा आपण पैसे कर्जाऊ घेतो त्याला आपण उत्पन्न म्हणत नाही कारण घेतलेल्या कर्जाची परतफेड आपणास हप्त्यांद्वारें करावी लागते. कर्जाच्या रकमेची हप्त्याने परतफेड म्हणजे खर्च असतो.

# उसनवारी

### उत्पन्न व कर्ज यात काय फरक आहे?

प्रत्येक ऋण किंवा कर्ज धनकोला परत करावे लागते. कर्ज घेणे म्हणजे उत्पन्न मिळवणे किंवा पैसे कमावणे असे नव्हे. जेव्हा आपणास पगार किंवा मजुरी इ. द्वारे पैसे मिळतात ते आपले उत्पन्न असते, तर कर्ज हे आपले उत्पन्न नसते. उलट कर्जाच्या हप्त्याची परतफेड म्हणजे खर्च असतो.

### आपण कर्ज केव्हा घेतो?

जेव्हा उत्पन्नापेक्षा आपला खर्च जास्त होतो व आणिबाणीच्या प्रसंगी जेव्हा खर्च करण्यासाठी आपल्याला पैशांची गरज असते तेव्हा आपण कर्ज घेतो. तसेच जेव्हा आपणास काही व्यवसाय करायचा असेल, तेव्हा आपल्याला पैशाची गरज भासते तेव्हा आपल्याला कर्ज घ्यावे लागते.

### पैसे कमी पडले की आपण नेहमीच कर्ज घेतले पाहिजे कां?




सण साजरे करण्यासाठी, लग्नासाठी, किमती दागिने विकत घेण्यासाठी किंवा महागडया उपभोग्य वस्तू घेण्यासाठी कर्ज घेऊ नका. जर यासाठी खर्च करायचाच असेल तर तो खर्च आपल्या चालू उत्पन्नातून किंवा साचलेल्या गंगाजळीतून करा. शक्यतो तो आपल्या चालू उत्पन्नातून किंवा बचतीतून उपभोग्य वस्तूंवर खर्च करावा. मात्र जर अशी परिस्थितीच उदभवली की आपल्याला उपभोग्य वस्तूंसाठी कर्ज घ्यावे लागत असेल तर आधी असा विचार करा की आपल्या चालू उत्पन्नातून आपण त्या कर्जाची परतफेड कशी करु शकतो. उपभोग्य वस्तूंमधून जर आपल्याला उत्पन्न मिळणार नसेल तर मग आपण घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करणार? जर, आधीचे कर्ज फेडण्यासाठी आपण वेगवेगळ्या ठिकाणाहून पुन्हाःपुन्हा कर्ज घेत राहीलो तर आपण कर्जाच्या दुष्ट सापळ्यात अडकतो.

**कर्ज नियंत्रणात ठेवा, नाहीतर कर्ज तुमचे नुकसान करेल.**

## फक्त उत्पादक कामांसाठीच कर्ज घ्या असा सल्ला का दिला जातो?




आपण जेव्हा कर्ज घेतो, तेव्हा ते व्याजासह फेडावे लागते. हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. कर्ज घेतांना आपली परतफेडीची क्षमता किती आहे याचा आढावा घेतला पाहिजे. जेव्हा आपण काही व्यवसाय करण्यासाठी कर्ज घेतो, तेव्हा त्यातून आपले उत्पन्न वाढते आणि मग निर्माण झालेल्या उत्पन्नातून आपण घेतलेल्या कर्जाची परतफेड करु शकतो. उदा. जेव्हा आपण बँकेतून बियाणे विकत घेण्यासाठी रु 1000 घेतो. व पिकलेल्या शेत मालाच्या विक्रीतून आपल्याला जर रु 10,000 मिळत असतील तर आपण रु 1000 मुद्दल + रु 100 व्याज एकून रु 1100 देऊन कर्जाची परतफेड सहजी करु शकू. शिल्लक राहिलेली रक्कम रु 8900 हे आपले अतिरिक्त उत्पन्न झाले. म्हणजेच आपण अशाच कामासाठी कर्ज घेतले पाहिजे की, ज्यातून जेवढे व्याज द्यावे लागेल त्याही पेक्षा जास्त उत्पन्न मिळेल. नाहीतर आधीचे कर्ज फेडण्यासाठी पुन्हा पुन्हा कर्ज घ्यावे लागेल.


**अशा कामासाठी कर्ज घ्या, ज्यातून तुमचे उत्पन्न वाढेल.**

## कर्ज मर्यादेमध्येच का घ्यावे?

कोणतेही कर्ज घेतले की त्याची परतफेड व्याजासह करावीच लागते हे समजून घ्या व कर्ज परत करण्याइतकी आपली कमाई आहे की नाही याची खात्री करुन घ्या. हे तपासण्याचा सोपा मार्ग म्हणजे आपले दर महिन्याचे उत्पन्न, खर्च व बचत पहा. कर्जाच्या मासिक हप्त्यापेक्षा आपली बचत जास्त असलीच पाहिजे.

# बँकेतून कर्ज घेणे

## जर सावकाराकडून कर्ज सहजरीत्या मिळत असेल तर बँकेकडून का घ्यावे ?




बँकेतून कर्ज घेताना काही जास्त वेळ लागत असला तरी सावकार किंवा इतर अनौपचारिक मार्गांनी कर्ज घेण्यापेक्षा ते नेहमीच चांगले असते, कारण बँक ही सुरक्षित, विश्वासू, पारदर्शक संस्था आहे. जी आपल्याला योग्य अटींवर कर्ज देऊन मदत करते. बँकांचे नियमन भारतीय रिझर्व्ह बँके द्वारे केले जाते. विशेष म्हणजे बँका अनौपचारिक मार्गापेक्षा म्हणजे नातेवाईक, मित्र, सावकार, गावचा सरपंच / पाटील यांनी आकारलेल्या व्याज दरापेक्षा कमी व्याजदर लावतात. शिवाय कर्ज देण्यापूर्वी बँका कर्जाचे पूर्ण कागदपत्र तयार करतात. त्यामुळे कर्जाचे दस्तावेजीकरण होते. काही वाद निर्माण झाल्यास वादनिवारण यंत्रणा उपलब्ध असते.

**बँकाचा कारभार पारदर्शी आहे आणि त्या कर्जावर वाजवी व्याजदर लावतात.**

## बँकांची तक्रार निवारण यंत्रणा म्हणजे काय आहे?

बँका या नियामक संस्था आहेत. प्रत्येक बँकेमध्ये तक्रार निवारण अधिकारी असतो. ज्याची माहिती बँकेच्या सर्व शाखांमध्ये नोटीस बोर्डावर व त्यांच्या वेबसाईटवर दिली जाते. बँकेच्या

कामकाजाबद्दल आपली काही तक्रार असेल तर आपण आपली तक्रार त्या बँकेच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे करु शकतो. जर त्यांनी दिलेल्या निर्णयाने आपले समाधान झाले नाही तर आपण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग लोकपालाकडे तक्रार नोंदवू शकतो.

**अशा पद्धतीची तक्रार निवारण यंत्रणा अनौपचारीकरीत्या घेतलेल्या कर्जावरसुद्धा उपलब्ध आहे का?**

नाही. अनौपचारीकरीत्या कर्ज देणाऱ्या संस्था या नियामक संस्था नाहीत, त्यामुळे त्यांच्या बाबतीत तक्रार निवारण यंत्रणा नाही. त्यामुळे त्यांच्या अटी व शर्तीमध्ये पारदर्शकता नाही आणि शिवाय त्यांच्या व्यवहारांची नोंदही नसते.


**बँका कर्ज देण्यासाठी सावकारापेक्षा थोडा जास्त वेळ का लावतात?**

बँका लोकांकडून ठेवी जमा करतात व ठेवीदारांच्या पैशातून गरजू लोकांना त्या कर्ज देतात. ठेवीदारांच्या ठेवीचे रक्षण करण्यासाठी त्यांनी दिलेल्या कर्जाचा योग्य वापर कर्जदार करीत आहे याची काळजी घेणे बँकाकडून अपेक्षित आहे. म्हणूनच कर्ज मंजूर करण्यापूर्वी बँका कर्ज प्रस्तावाची पूर्णपणे छाननी करतात. त्यामुळे थोडा विलंब होतो. जरी कर्ज देण्यास थोडा विलंब होत असला तरी यात कर्जदाराचाच फायदा आहे. कारण त्या प्रत्येक व्यवहाराची/गोष्टीची नोंद ठेवतात. त्यामुळे त्याला फसवले जाण्याची काडीमात्र शक्यता नाही. हे खरे तर ठेवीदार आणि कर्जदार दोघांच्याही हिताचे आहे.

**बँका कोणकोणत्या प्रकारची कर्जे देतात?**

बँका वेगवेगळ्या कारणांसाठी कर्जे देतात, जसे घर विकत घेण्यासाठी, शिक्षणासाठी कर्ज, शेती व शेतीविषयक कामे करण्यासाठी कर्ज, व्यापार-व्यवसाय सुरु करण्यासाठी, उपभोग्य वस्तू विकत घेण्यासाठी कर्ज इ. सर्व प्रकारच्या गरजांसाठी बँका कर्जे देतात.

**तुमच्या सर्व प्रकारच्या कर्जाची गरज बँका पूर्ण करतात.**



## मला बँकेकडून कर्ज कसे मिळेल?

आपल्याला ज्यासाठी कर्ज हवे त्या कारणानुसार बँकेकडे प्रथम अर्ज दाखल करावा लागतो. बँक या अर्जाची आपल्या परतफेडीच्या क्षमतेनुसार छाननी करते आणि नंतर कर्ज मंजूर करते. हे कर्ज बँकेने निर्धारित करुन दिलेल्या हप्त्यानुसार व्याजासह परत करायचे असते.

## बँकेकडून कर्ज घेण्यासाठी किती किंमत मोजावी लागते?

कर्ज घेतलेल्या रकमेवर जेवढे व्याज लावले जाते, ती कर्जाची किंमत होय. आपण कर्जावर किती व्याज देणार हे समजून घ्या. बँका सहसा वार्षिक व्याज लावतात. उदा. एका वर्षाला जर व्याज दर 12 टक्के असेल तर एका महिन्याला 1 टक्का होतो. कर्जाच्या किंमतीमध्ये किती वेळा चक्रवाढ पद्धतीने वाढ होणार हेही महत्त्वाचे असते. इतर अनौपचारिक कर्ज देणारे आपल्याला कधीही कर्जाची खरी किंमत सांगत नाहीत मात्र बँकांमध्ये वेगवेगळ्या कारणासाठी लागणारे व्याजदर व इतर शुल्क जनतेच्या माहितीसाठी नोटीस बोर्डावर प्रदर्शित केलेले असते आणि ते सर्व कारणांसाठी/सर्व ग्राहकांसाठी समान असते. किती शुल्क लावणार हे बँका सार्वजनिकरीत्या जाहीर करतात आणि एकाच प्रकारच्या कारणांसाठी एकाच प्रकारच्या ग्राहकांसाठी ते समान असतात. मात्र इतर अनौपचारिकरीत्या कर्ज देणाऱ्यांकडून असे होत नाही.

## कर्जासाठी आपल्याला काही हमी द्यावी लागते का?

होय. हमी ही आपण कोणत्या पद्धतीचे कर्ज घेणार व कोणत्या कारणासाठी घेणार यावर अवलंबून असते. साधारणतः लहान कर्जासाठी हमी देण्याची गरज नसते. परंतु मोठ्या रकमेसाठी काही हमी देणे गरजेचे असते. हमी कर्जाच्या पद्धतीवर अवलंबून असते जसे आपण कर्जाद्वारे जी मालमत्ता निर्माण करु त्याच्या रुपात असते किंवा इतर कोलॅटरल सिक्युरिटीज जसे जमीन, घर इ. स्वरुपात असते.

## आपण कर्जाची परतफेड का बरे करावी?

कारण बँका ठेवीदारांचे पैसे कर्ज देण्यासाठी वापरतात. जर आपण बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही तर बँकेची आर्थिक स्थिती बिकट होईल. त्याचा परिणाम बँकेला त्यांच्या ठेवीदारांच्या ठेवी वेळेत परत न देण्यावर होईल. जर बँकेचे सर्वच कर्जदार असे वागू लागले तर परिणामतः ठेवीदार आपण आणि आपल्या नातेवाईकांनी बँकेत ठेवलेल्या पैशावर संक्रांत येईल. शिवाय बँकेला आपण परतफेड केलेले पैसे दुसऱ्या व्यक्तींना कर्ज देण्यासाठी

वापरायचे असतात. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे जर आपण कर्जाची परतफेड केली तरच बँक पुढच्या वेळी आपल्याला कर्ज देईल.

**जर आपण बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही तर काय होईल?**

जर आपण घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही तर आपण कर्जासाठी हमी म्हणून ठेवलेल्या गहाण वस्तूचा ताबा घेण्याचा अधिकार बँकेला असेल तसेच व्याजासह कर्जाचे मुद्दल आपल्याकडून वसूल करण्यासाठी बँक आपल्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकेल. हे लक्षात ठेवले पाहिजे.

❖❖❖

# टिप्पणी

# टिप्पणी

# टिप्पणी

# भारतीय रिझर्व्ह बँक

## विशेष सूचना -

सामान्य माणसाच्या माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने वित्तीय शिक्षण देण्यासाठी हा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात दिलेल्या बँकिंग व्यवहाराच्या व्याख्या लोकांना समजण्यास सोप्या व्हाव्यात या दृष्टीने समाविष्ट केलेल्या आहेत, हे कायदेशीर किंवा तांत्रिक स्पष्टीकरण नाही. वाचकांना नम्र विनंति आहे की त्यांनी ही दैनंदिनी अवश्य वाचावी व तिचा विवेकाने वापर करावा. या दैनंदिनीत काही चूक-भूल राहू नये यासाठी पूर्ण प्रयत्न केला आहे. तरीही जर काही चूक-भूल किंवा उणीवा आढळल्यास कृपया त्या दैनंदिनीत दिलेल्या आमच्या पत्त्यावर निःसंकोचपणे पाठवाव्यात. म्हणजे पुढील आवृत्ति छापतांना त्यात योग्य त्या दुरुस्त्या करता येतील. याद्वारे असे अधिसूचित केले जात आहे की, जर कोणाला या दैनंदिनीतील माहितीचा उपयोग केल्यामुळे कोणत्याही प्रकारची हानी किंवा नुकसान झाल्यास त्यास प्रकाशक जबाबदार रहाणार नाहीत.

# बँकेशी साथ गरीबीवर मात




भारतीय रिझर्व्ह बँक